**प्रेसनोट** दिनांक :—०७.०३.२०२२

आरोपी **लोकसेवक शेख मोहिब अहमद तुफैल अहमद, वय ४० वर्षे, तलाठी, सज्जा पुसेगाव तहसिल कार्यालय, सेनगाव ता. सेनगाव वर्ग—३, रा. माईल्स स्टोन स्कुलच्या समोर, माळीगल्ली, मंगळवारा, परभणी** यांनी ४०,०००/—रू. च्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती ३५,०००/—रू. लाचेची रक्कम ठरवुन स्विकारण्यास सहमती दर्शवुन पहिला हप्ता म्हणुन १८,०००/—रू. दि.०७.०३.२०२२ रोजी स्वत: स्विकारली.

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.२५.०२.२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली येथे तक्रार दिली होती की, **तक्रारदार यांचे शेतीचे वाटणीपत्रा आधारे तक्रारदार यांचे भाउ नारायण यांचे नांवा वरून तक्रारदार व त्यांच्या पत्नीच्या नावावर शेतीचा फेरफार करून देण्यासाठी** यातील लोकसेवक तलाठी शेख मोहिब अहमद, सज्जा पुसेगाव हे ४०,०००/—रू. ची लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार दिली होती.

त्यावरून दि.२८.०२.२०२२ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी केली असता यातील **आरोपी लोकसेवक शेख मोहिब अहमद तुफैल अहमद, वय ४० वर्षे, तलाठी, सज्जा पुसेगाव तहसिल कार्यालय, सेनगाव ता. सेनगाव वर्ग—३, रा. माईल्स स्टोन स्कुलच्या समोर, माळीगल्ली, मंगळवारा, परभणी** यांनी ४०,०००/—रू. च्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती ३५,०००/—रू. लाचेची रक्कम ठरवुन स्विकारण्यास सहमती दर्शवुन दि.०७.०३.२०२२ रोजी पहिला हप्ता म्हणुन १८,०००/—रू. तलाठी सज्जा कार्यालय, पुसेगाव येथे स्विकारली आहे.

त्यावरून **आरोपी लोकसेवक शेख मोहिब अहमद तुफैल अहमद, वय ४० वर्षे, तलाठी, सज्जा पुसेगाव तहसिल कार्यालय, सेनगाव ता. सेनगाव वर्ग—३, रा. माईल्स स्टोन स्कुलच्या समोर, माळीगल्ली, मंगळवारा, परभणी** यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्री धरमसींग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शना खाली हिंगोली युनिट येथील श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली, श्री प्रफुल्ल अंकुशकर, पोलीस निरीक्षक, सपोउपनि/युनुस सिध्दीक, पोह/विजय उपरे, पोह/विजय शुक्ला, पोना/महारूद्र कबाडे, पोना/ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना/तानाजी मुंढे, पोशि/राजाराम फुपाटे, मपोना/योगीता आवचार, चापोना/हिम्मतराव सरनाईक ला.प्र.वि. हिंगोली यांनी केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली हे करीत आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा.

**श्री धरमसींग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, — ९९२३४१७०७६**
**श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली — ९८२२२००९५९**
**टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२४५६—२२३०५५,**
**संकेतस्थळ** www.acbmaharashtra.net